पुणे शहर पोलीस

# दर्पण

## सप्टेंबर २०१९

# अभिप्राय...

'दर्पण' पुस्तका बाबत ..

मी पोना 6532 कुंभार, नेमणूक वानवडी पो.स्टे.

सध्या मी वानवडी पो.स्टे. येथे डी.बी./ठाणे अंमलदार म्हणून कर्तव्य करीत आहे. पुण्याचे पोलीस आयुक्त श्री. डॉ. के. व्यंकटेशम सर यांनी पोलीस दलाची जनमानसात प्रतिमा उंचावण्यासाठी 'दर्पण' पुस्तकाची संकल्पना सुरू केली आहे. या दर्पण पुस्तकामध्ये पोलीस अधिकारी/व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामाचा गौरव कार्य वेळेत छापला गेला त्यामुळे समाजातील लोकांना पोलीस सुद्धा चांगले काम करतो आहे याची जाणीव होऊ लागली आहे. त्यामुळे पोलिसांची प्रतिमा चांगली होण्यास मदत झाली आहे. दर्पण पुस्तकामध्ये पोलिसांचे कार्याचा चांगल्या कामाचा गौरव केला जातो हे पाहून इतर पोलीस बांधव हे सुद्धा चांगले काम करण्याची इच्छा बाळगून चांगले काम कसे होईल यासाठी प्रयत्न करतात.

'दर्पण' पुस्तक खरोखरच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या गौरवाचे पुस्तक आहे असे मला वाटते.

(सही)

पोना 6532 कुंभार [illegible]
वानवडी पो.स्टे. पुणे

**गुडवर्क व दर्पण या पुस्तका बाबत अभिप्राय**

पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामास (Good Work) वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्याचा व वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या कात्रणांपासून तयार केलेले दर्पण हे पुस्तक नागरिकांना पाहणेसाठी पोलीस स्टेशन स्तरावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. हा उपक्रम हा अत्यंत चांगला आहे.

या उपक्रमामुळे पोलीस अधिकारी व कर्मचारी हे दैनंदिन कर्तव्या दरम्यान स्वयंस्फुर्तीने चांगले काम करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. तसेच अशा केलेल्या चांगल्या कामाची माहिती ही पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे व्हॉटस्ॲप ग्रुप्सवर प्रसिध्द होत असल्याने त्याबाबत इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून शुभेच्छा देण्यात येतात त्यामुळे चांगले काम केलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो तसेच इतरांना चांगले काम करण्याची व त्यास प्रसिध्दी देण्याची ईर्शा निर्माण होते.

तसेच दर्पण हे पुस्तक येरवडा पोलीस स्टेशन येथे येणारे नागरिक वाचतात व पोलीसांचे चांगले कामाबद्दल चर्चा करतात. तसेच पोलीसांचे कामाबद्दल लोकांमध्ये विश्वास निर्माण होत आहे. वर्तमान पत्रातील चांगल्या कामाचे प्रसिध्दी मुळे नागरिक समक्ष भेटून अभिनंदन व शुभेच्छा देतात. त्यामुळे एकप्रकारे चांगला अनुभव मिळतो व त्यातून अधिक चांगले काम करण्यासाठी प्रेरणा मिळत आहे. सदरचे उपक्रम हे अत्यंत चांगले असून ते यापुढेही कायमस्वरूपी चालू ठेवावेत.

(सही)

( शुभांगी मगदुम )
महिला पोलीस उप निरीक्षक
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) गुन्ह्यांना पायबंद | : | १ ते १४ |
| २) कारवाई | : | १५ ते ४४ |
| ३) लोकाभिमुख उपक्रम | : | ४५ ते ६४ |
| ४) पोलिसांमधील माणूस | : | ६५ ते ७४ |
| ५) समुपदेशन व सामाजिक बांधीलकी | : | ७५ ते ८२ |
| ६) वाहतुक सुलभता | : | ८३ ते ९० |
| ७) उत्कृष्ट कार्य | : | ९१ ते ९६ |
| ८) उत्कृष्ट तपास | : | ९७ ते ११४ |

# गुन्ह्यांना पायबंद

गुन्ह्यांना पायबंद

पुढारी – दि. ४ सप्टेंबर, २०१९

# पिस्तुलाची हौस पडली महागात!

## दोघांना अटक; भारती विद्यापीठ पोलिसांची कारवाई

**पुणे : प्रतिनिधी**

बेकायदेशीर पिस्तूल बाळगणाऱ्यास भारती विद्यापीठ पोलिसांनी सापळा रचून अटक केली. त्यांच्याकडून एक पिस्तूल व एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. पिस्तूल देणाऱ्याचाही शोध घेऊन त्याला पकडण्यात आले आहे.

मनोहर रघुनाथ मांगडे (वय ४२, रा. मांगडेवाडी) व मारुती काटयाप्पा घोरपडे (वय ४३, रा. लासुर्णे, ता. इंदापूर) असे अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात आर्म ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कर्मचारी कुंदन शिंदे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे.



आरोपींना अटक करून त्यांच्याकडून जप्त केलेल्या पिस्तुलासोबत अधिकारी व कर्मचारी.

भारती विद्यापीठ पोलिसांचे पथक पेट्रोलिंग करीत असताना कर्मचारी कुंदन शिंदे यांना एक व्यक्ती कात्रज परिसरात उभी असून, त्याच्याजवळ पिस्तूल असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर वरिष्ठ निरीक्षक विष्णू पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पथकातील उपनिरीक्षक सुबराव लाड, कर्मचारी कृष्णा बढे, देशमुख, पवार, सूळ व त्यांच्या पथकाने या ठिकाणी सापळा रचून मनोहर याला पकडले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ एक गावठी बनावटीचे पिस्तूल व एक जिवत काडतूस सापडले. मांगडे याने हे पिस्तूल कशासाठी तसेच कोणाकडून आणले? याबाबत चौकशी केली असता, हौसेखातर पिस्तूल घेतल्याचे त्याने सांगितले.

या वेळी पोलिसांनी घोरपडे याचा शोध घेऊन त्यालाही पकडले. चौकशी केली असता त्याने हे पिस्तूल २०१५ साली एका बिहारी व्यक्तीकडून विकत घेतल्याचे सांगितले. आरोपींनी पिस्तूलाचा कोठे वापरले आहे का? याबाबत चौकशी करण्यात येत आहे. दरम्यान, मनोहर हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याच्यावर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल आहे. तर, घोरपडे याच्यावर कोथरूड पोलिस ठाण्यात आर्म ॲक्ट, तसेच बारामती पोलिस ठाण्यात जमिनीबाबत फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल आहे.

लोकमत – दि. २२ सप्टेंबर, २०१९

# गुन्हे शाखेने ८० लाखांचे हस्तिदंत पकडले

पुणे : आंतरराष्ट्रीय बाजारात ८० लाख रुपये किंमत असलेले ४ हस्तिदंत विक्रीसाठी आलेल्या एकाला गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्यांच्याकडून पोलिसांनी हस्तीदंत जप्त केले आहेत.

भीमा बोग्रीया मुडावत ऊर्फ चव्हाण (वय ५०, रा. आनंदनगर, हडपसर, मूळ, रामपूर, तेलंगणा) असे अटक केलेल्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार : शहरात हस्तिदंत विक्रीसाठी एक जण येणार असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून भीमाला ताब्यात घेतले. त्याच्याकडील पिशवीची तपासणी केली असता, त्यामध्ये ८० लाख रुपये किमतीचे ४ हस्तिदंत असल्याचे दिसून आले. त्याच्या ताब्यातून हस्तिदंत, २ मोबाईल असा ८० लाख १० हजार १०० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

लोकमत – दि. ५ सप्टेंबर, २०१९

# दागिनेचोर जेरबंद

लोकमत न्यूज नेटवर्क

धनकवडी : दागिने चोरुन फरार झालेल्या चोरट्यास दहा वर्षांनी अटक करण्यात भारती विद्यापीठ पोलिसांना यश आले आहे. उदय विष्णू आवटे (वय ४०, रा. कुंडल, ता. पलूस, जि. सांगली) याला पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून ५०,००० रुपये किमतीचे २६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

कात्रज येथील स्वागत रेसिडेन्सी येथे राहणाऱ्या सविता सतीश पवार (वय ३९) यांच्या घरातून आरोपी उदय विष्णू आवटे यांनी जुलै ते डिसेंबर २००९ च्या दरम्यान ५०,००० रुपये किमतीचे २६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरी करुन नेले होते. याबाबत भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यामध्ये पवार यांनी फिर्याद दिली होती.

आरोपी उदय विष्णू आवटे गेली दहा वर्षे फरार झाला होता. दरम्यान, आरोपी सांगली येथील कुंडल येथे राहत असल्याबद्दलची गुप्त माहिती खास बातमीदारांकडून मिळाली. पोलीस कर्मचारी महेश मंडलिक व अभिजित जाधव यांना मिळालेल्या बातमीच्या आधारे लगेच तपास पथकाचे अधिकारी सुबराव लाड यांना सांगून आरोपीला सांगली येथे जाऊन सापळा रचून ताब्यात घेतले व त्याच्याकडून सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. पोलीस उपनिरीक्षक सुबराव लाड अधिक तपास करीत आहेत.

लोकमत – दि. ५ सप्टेंबर, २०१९

# गर्दीत चोऱ्या करणाऱ्यांना दामिनी पथकाने पकडले

## बॅग ब्लेडने कापून चोरी करायच्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे : गणेशोत्सवात** होणाऱ्या गर्दीचा गैरफायदा घेऊन महिलांच्या बॅगेतून ऐवज लंपास करणाऱ्या दोन महिलांना दामिनी पथकाने पकडले. कसबा पेठेतील गणपती स्टॉलवर खरेदीसाठी आलेल्या महिलेचा हँडबॅग ब्लेडने कापून चोरी करणाऱ्या संशयित महिला असल्याचा कॉल पोलीस नियंत्रण कक्षाला सोमवारी दुपारी अडीच वाजता आला. त्यावरुन दामिनी नरके व वडमारे या तातडीने घटनास्थळी पोहोचल्या. त्यांनी तेथे चौकशी केल्यावर एका महिलेने आपली हँडबॅग ब्लेडने कापून तिच्यातील छोटी पर्स चोरुन नेत असल्याचे सांगितले. दामिनी पथकातील महिलांनी यशोदा सुनील भगवाने (वय ५०) हिला पकडून विश्रामबाग पोलिसांच्या ताब्यात दिले.

दामिनी मार्शल आत्राम, मुंडे, चलेकर, शेख या तुळशीबागेत मंगळवारी पायी पॅट्रोलिंग करीत असताना एका महिला संशयास्पदरीत्या फिरताना दिसून आली. त्यांनी या महिलेकडे चौकशी केल्यावर तिने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिले. आसमा मुजाहेद सय्यदा (वय ३३, रा. धनगरवाडा, पैठण, औरंगाबाद) असे तिचे नाव आहे. विश्रामबाग पोलीस ठाण्यात आणल्यावर पोलिसांनी तिची झडती घेतली. तिच्याकडील कापडी पिशवीत ५ हजार ९०० रुपये रोख, मोबाईल व छोटा कटर मिळाला.

विश्वासात घेऊन चौकशी केल्यावर तिने दगडूशेट गणपती मंदिराजवळ एका महिलेच्या पर्समधील पैसे चोरल्याचे सांगितले. त्यातील ५०० रुपये खर्च केल्याचे सांगितले. त्याबाबत तपासणी केल्यावर १९ ऑगस्टला विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता.

लोकमत – दि. २१ सप्टेंबर, २०१९

# सात वर्षांपासून फरार आरोपी आला ताब्यात

## पोलिसांना देत होता गुंगारा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे : फसवणुकीच्या** गुन्ह्यात गेल्या सात वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्यास फरासखाना पोलिसांनी सापळा रचून अटक केली. बिरजू ऊर्फ बंटी दिनकर पाटील (वय ३३, रा. चंदननगर) असे अटक केलेल्याचे नाव आहे.

बिरजू पाटील याने २०१२ बजाज फायनान्स कंपनीत बनावट कागदपत्रे देऊन ४ लाख १८ हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. तसेच, कसबा पेठेतील दुकानातून इलेक्ट्रॉनिक्स वस्तू घेतल्या होत्या. याप्रकरणी फरासखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. गुन्हा केल्यानंतर तो पसार झाला होता. त्याचा शोध घेण्यात येत होता. मात्र, तो पोलिसांना गुंगारा देण्यात यशस्वी होत होता. पाहिजे असलेल्या आरोपी व सराईतांची माहिती काढली जात आहे.

यावेळी उपनिरीक्षक यशपाल सूर्यवंशी यांना माहिती मिळाली की पाटील हा गणेश पेठेत आला आहे. त्यानुसार, वरिष्ठ निरीक्षक जगन्नाथ कळसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने त्याला सापळा रचून अटक केली.

# तब्बल २२ वर्षे फरार असलेल्यास केले जेरबंद

## गुन्हे शाखेची कारवाई : सोन्याचे दुकान फोडून ४० लाखांचा ऐवज चोरला

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : तब्बल २२ वर्षे पोलिसांना गुंगारा देणाऱ्या आरोपीला पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने सापळा रचून अटक केली आहे.

विलास ऊर्फ अविनाश विश्वनाथ भालेराव (वय ४८, रा. सणसवाडी, शिरूर) असे त्याचे नाव आहे. त्याने साथीदारांच्या मदतीने २२ ऑगस्ट १९९७ रोजी येरवड्यातील सोन्याचे दुकान फोडून ४० लाख रुपयांचा ऐवज चोरला होता. त्याचे इतर साथीदार संतोष लक्ष्मण ओव्हाळ, राजेंद्र मामाजी नाडर, रामभाऊ विश्वनाथ सूर्यवंशी व चोरीचे सोने घेणारे दोन सोनार यांना पोलिसांनी यापूर्वीच अटक केली होती. त्यांपैकी तीन आरोपी व एका सोनाराला न्यायालयाने ७ वर्षांची शिक्षा ठोठावली होती.

### ४० घरफोडीचे गुन्हे दाखल

◆ सोन्याच्या दुकानावर दरोडा टाकल्यानंतर त्याची वाटणी करून विलास फरार झाला होता. तो लातूर, घाटकोपर, पारनेर, अहमदनगर येथे जागा बदलून राहत होता. विलासवर यापूर्वी ४० घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रतनचंद जैन यांच्या येरवडा येथील काश्मिरी कॉलनी येथे असलेल्या अंबिका ज्वेलर्सवर विलास व त्याच्या साथीदारांनी दरोडा टाकला होता. जैन हे दुकानाच्या मागे राहतात. गुन्ह्यातील चार आरोपींनी रात्री साडेअकराच्या सुमारास जैन यांना घराबाहेर बोलावून तलवारीने त्यांच्यावर वार केले होते. तसेच, रिव्हॉलवर डोक्याला लावून जिवे मारण्याची धमकी दिली. आरोपींनी जैन यांना रात्री दुकान उघडायला लावले. त्यानंतर दुकानातील रोख रक्कम व दीड किलो सोन्याचे दागिने असा ४० लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला होता.

येरवडा पोलिसांनी या गुन्ह्याचा तपास करताना दरोडा टाकणाऱ्या आरोपींना अटक केली होती; परंतु विलास हा पोलिसांना गुंगारा देण्यात यशस्वी झाला. गुन्ह्यातील इतर आरोपींना न्यायालयाने शिक्षा सुनावली तरी विलास फरारी होता. पुणे पोलीस दलाच्या गुन्हे शाखेकडून शहरातील फरार व पाहिजे आरोपींच्या शोधाकरिता सहायक पोलीस आयुक्त यांच्या अधिपत्याखाली विशेष पथक स्थापन केले आहे. या पथकातील पोलीस नाईक महेश निंबाळकर यांना फरार आरोपी विलास हा शिरूर येथे राहत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. त्यानंतर महेश निंबाळकर तसेच संभाजी नाईक, राजकुमार पाटील यांनी सोमवारी सणसवाडी येथे सापळा रचून विलासला ताब्यात घेतले. त्याच्याकडे गुन्ह्याबाबत चौकशी केली असता त्याने सांगितले, की आरोपींसोबत विलास याची येरवडा कारागृहात ओळख झाली होती. त्यानंतर सगळे कारागृहाबाहेर आल्यानंतर त्यांनी शिक्रापूर येथील मुन्ना दा ढाबा येथे या गुन्ह्याचा कट रचला होता.

आरोपीला येरवडा पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे अप्पर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उपआयुक्त बच्चन सिंग, सहायक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पोलीस पथकातील महेश निंबाळकर, संभाजी नाईक, राजकुमार पाटील यांच्या पथकाने केली.

# सराईत गुन्हेगार जेरबंद

## सख्ख्या भावांकडून आठ गुन्हे उघडकीस; येरवडा पोलिसांची कामगिरी

म. टा. प्रतिनिधी, येरवडा

चोरीचे दागिने विक्री करण्यासाठी आलेल्या दोन जणांना सापळा रचून अटक केलेल्यानंतर त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता वाहन आणि जबरी चोरीचे आठ गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांनी आरोपींकडून पाच दुचाकी, दीड तोळे सोने, दोन मोबाइल आणि रोख रक्कम असा एकूण तीन लाख रुपयांचा ऐवज हस्तगत केला. विशेष म्हणजे अटक केलेले दोघे आरोपी सख्खे भाऊ आहेत.

शकील शब्बीर शेख उर्फ काकड्या (वय २०) आणि समीर शब्बीर शेख (वय २२, दोघे रा. साठे वस्ती, लोहगाव) असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वडगाव शेरी येथील शोभना आणि संतोष कोठारी हे दाम्पत्य ७ ऑगस्ट रोजी येरवडा, शास्त्रीनगर रस्त्यावरून जात असताना आरोपींनी त्यांना अडवले. हत्यारांचा धाक दाखवून शोभना यांच्या गळ्यातील दागिने हिसकावून दोघेही पळून गेले. कोठारी यांनी या प्रकरणी येरवडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. गेल्या काही दिवसांपासून तपास पथकाकडून चोरीचा तपास चालू होता. या दरम्यान तडीपारीच्या भीतीने रेकॉर्डवरील दोन गुन्हेगार फरारी झाले होते. हे गुन्हेगार येरवडा गाडीतळ परिसरात चोरीचे दागिने विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती उपनिरीक्षक मंगेश भांगे यांना मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक युनूस शेख यांच्या मार्गदर्शनाखाली भांगे, सहायक उपनिरीक्षक बाळू बहिरट, कर्मचारी हनुमंत जाधव, अशोक गवळी, नवनाथ मोहिते, मनोज कुदळे, सुनील नागलोत, अजय पडोळे, शरद भांगार, समीर भोरडे, नवनाथ मोहिते, विष्णू सरवदे आणि पंकज मुसळे यांच्या पथकाने आरोपींना अटक केली.

येरवडा परिसरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटना वाढल्या आहेत. सोसायट्यांसह व्यापाऱ्यांच्या दुकानांना चोरट्यांकडून लक्ष्य केले जात आहे. यामुळे पोलिसांनी रात्रीच्या वेळी गस्त वाढविण्याबरोबरच संशयितांवर वेळीच कारवाई करण्याची गरज आहे.


आरोपींकडून जप्त केलेला मुद्देमाल दाखवितांना पोलिस पथक.

> अटक केलेले दोन्ही आरोपी सख्खे भाऊ असून, सराईत गुन्हेगार आहेत. पोलिस तपासात त्यांनी आठ गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे. त्यांच्याकडून दुचाकी, दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. दोघांची रवानगी कारागृहात करण्यात आली आहे.
>
> – अजय वाघमारे, पोलिस निरीक्षक (गुन्हे), येरवडा पोलिस ठाणे

स्वप्नील शिंदे





## गर्दीतही वर्दीचा गुन्हेगारांवर 'वॉच'

विसर्जन मिरवणुकीच्या वेळी तपासणीसाठी पोलिसांकडून 'स्पॉटर किट' या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. आतापर्यंत आढळलेल्या सर्व गुन्हेगारांची माहिती आणि छायाचित्रे या यंत्रणेत साठविण्यात आली असून, संबंधितांशी साधर्म्य असणारी व्यक्ती या माध्यमातून शोधणे सुलभ होणार आहे. विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात ठिकठिकाणी पोलिसांकडून तपासणी करण्यात येत आहे.

महाराष्ट्र टाइम्स - दि. १८ सप्टेंबर, २०१९

# बनावट नंबर प्लेट लावणारा अटकेत

म. टा. प्रतिनिधी, पुणे




संत कबीर चौकात सिग्नल तोडून जाताना एका कारचालकास वाहतूक पोलिसांनी पकडले. त्या वेळी तो चालक बनावट क्रमांकाची नंबरप्लेट लावून फिरत असल्याचे आढळल्यानंतर त्याच्या विरोधात समर्थ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राहुल प्रकाश ओव्हाळ (वय ३०, रा. दोंदे. ता. खेड) असे अटक केलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी पोलिस कर्मचारी जयसिंग मोहिते यांनी तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार मोहिते हे समर्थ वाहतूक विभागात नेमणुकीस आहेत. घटनेच्या दिवशी ते संत कबीर चौकात ते वाहतूक नियमन करत होते.

याच वेळी ओव्हाळ कार घेऊन कॅम्प भागातून पॉवर हाउस चौकाकडे जात होता. या वेळी त्याने संत कबीर चौकातील सिग्नल तोडला. यामुळे पोलिस कर्मचारी जयसिंग मोहिते यांनी त्याला पकडले. आणि त्याच्याकडे कागदपत्रांची विचारपूस केली. मात्र, त्याच्याकडे कोणतीच कागदपत्रे नव्हती. सिग्नल तोडल्यामुळे मोहिते यांनी त्याची अधिक चौकशी केली असता मोहिते यांना त्याच्या गाडीच्या क्रमाकांची माहिती घेतली. त्या वेळी त्यांना ओव्हाळने आरटीओकडे नोंदणी असणारा एमएच १४ डीए ७११७ हा क्रमांक न टाकता त्याने एमएच १४ डीए ७७७७ हा बनावट नंबर टाकल्याचे समोर आले आहे.

बनावट नंबर प्लेट लावल्यामुळे त्याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी समर्थ पोलिस अधिक तपास करीत आहेत.

महाराष्ट्र टाइम्स - दि.२२ सप्टेंबर, २०१९

# दरोड्याच्या तयारीतील टोळी पकडली

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पेट्रोलपंपावर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या टोळीला स्वारगेट पोलिसांनी अटक केली आहे. शंकरशेठ रस्त्यावरील पंपावर शुक्रवारी रात्री दरोडा टाकण्याच्या तयारीत असताना टोळीला ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून दोन कोयते, दोरी, ब्लेड, मिरचीपूड आणि वाहने जप्त करण्यात आली आहेत.

अजहर बादशाह शेख (वय १९, रा. इंदिरानगर, बिबवेवाडी), सूरज सुधीर पाटील (वय २३, अप्पर स्मशानभूमीजवळ, बिबवेवाडी), अंकुश नारायण धांडे (वय ३४), सुरेंद्र प्रेमदास वंजारी (वय २६), गणेश प्रल्हाद चव्हाण (वय २४, तिघे रा. गोकुळनगर, कात्रज) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (२० सप्टेंबर) रात्री काही युवक शंकरशेठ रोडवरील सरस्वती पेट्रोल पंपावर वाद घालत असल्याची माहिती स्वारगेट पोलिसांना मिळाली. त्यानंतर वरिष्ठ निरीक्षक ब्रह्मानंद नाईकवडी, निरीक्षक शब्बीर सय्यद, फौजदार समाधान कदम आदींच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. टोळक्याच्या संशयास्पद हालचालींमुळे पोलिसांनी त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे दरोड्यासाठी हत्यारे आढळून आली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २२ सप्टेंबर, २०१९

# डॉक्टरच्या वेशातील वाहनचोरास अटक

## सीसीटीव्ही व खबऱ्याच्या मदतीने चोरटा गजांआड

**Shrikrishna.Kolhe**
@timesgroup.com
Tweet : ShrikrishnaMT

### डॉक्टर असल्याचे भासवायचा

शाहरुखचे बारावीपर्यंत शिक्षण झाले आहे. त्याने काही दिवस मेडिकल स्टोअरमध्ये काम केले आहे. तो ससून रुग्णालयात स्वच्छतेची कामे करीत असे. या ठिकाणीच काम करणाऱ्या एका डॉक्टरकडे चालक म्हणून काम करायचा. ससूनमधून बाहेर पडल्यानंतर तो डॉक्टरचा ॲप्रन घालत असे. त्यामुळे नागरिकांना तोच डॉक्टर असल्याचे वाटायचे. त्याने दीड ते दोन वर्षांपासून दुचाकी चोरण्यास सुरुवात केली होती. चोरलेली वाहने एका मोठ्या वाहनात घालून, तो सासवड परिसरातील ग्रामीण भागात कमी किमतीत विक्री करायचा. दुचाकीची कागदपत्रे नंतर आणून देतो, असे नागरिकांना सांगत असे.

**पुणे :** चोऱ्या करताना पकडले जाऊ नये; म्हणून चोरटे वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरतात; पण या चोरट्यांना पकडण्यासाठी पोलिसांकडूनही नेहमीच एक पुढे पाऊल राहण्याचा प्रयत्न केला जातो. शहराच्या मध्यवस्तीतील गर्दीच्या ठिकाणी लावलेल्या दुचाकी डॉक्टररच्या वेशात एक जण चोरत होता. पकडूनही संशय येऊ नये; म्हणून डॉक्टरकडे असतात त्या सर्व वस्तू स्वतःकडे ठेवत होता; पण ही युक्ती जास्त दिवस पोलिसांपासून लपून राहिली नाही. एका ठिकाणी सीसीटीव्हीत चोरी करताना दिसल्यानंतर खबऱ्यामार्फत माग काढून, पोलिसांनी या तरुणाला बेड्या ठोकल्या.




वर्षाला पुणे शहरातून दीड हजारांपेक्षा जास्त वाहने चोरीला जातात. या वाहनचोरांना पकडण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू असतात; पण वाहनचोऱ्या कमी होताना दिसत नाहीत. शहराच्या मध्यवस्तीत वाहने चोरीचे प्रमाण वाढले होते. त्याचा माग काढण्याचे काम फरासखाना पोलिसांचे तपास पथक करीत होते.

ज्या परिसरातील पार्किंगमधून दुचाकी चोरीला गेल्या आहेत, त्या परिसराचे सीसीटीव्ही फुटेज पाहिले; पण ते अंधूक दिसत असल्यामुळे आरोपी शोधताना अडचणी येत होत्या; पण काही ठिकाणी डॉक्टरच्या वेशातील व्यक्ती पार्किंगमध्ये थांबलेली दिसत होती. तिच्याबाबत पोलिसांना संशय आला नाही; पण आणखी काही ठिकाणचे फुटेज पाहिल्यानंतर डॉक्टरच्या वेशातील व्यक्ती दिसून आली. तीच व्यक्ती वाहनचोऱ्या करत असल्याचे आढळून आले.

फरासखाना पोलिस ठाण्याचे कर्मचारी शंकर कुंभार यांनी त्या व्यक्तीचा माग काढण्यास सुरुवात केली. त्या वेळी वाहन चोऱ्या करणारी व्यक्ती ही शाहरुख रज्जाक पठाण (वय २२, रा. बुधाची वाडी, ता. पुरंदर) असल्याचे समजले. त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक किशोर नावंदे, उपनिरीक्षक महेंद्र पाटील यांच्या पथकाने त्याला पकडले. त्या वेळी त्याच्याकडे डॉक्टर घालतात तसे ॲप्रन आढळले. त्यावर बी. जे. मेडिकलचा एमबीबीएस डॉक्टर असल्याची बनावट नेमप्लेट, डॉक्टरांना आवश्यक असणाऱ्या वस्तूची एक बॅग होती. कोणी अडविल्यास तो डॉक्टर असल्याचे सांगत होता. त्याच्याकडे तपास केल्यानंतर त्याने पुणे शहर व जिल्ह्यात ३३ वाहनचोरीचे गुन्हे केल्याचे उघडकीस आले. त्याच्याकडून २६ दुचाकी, तीन कार व एक टेम्पो असा २७ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पुढारी – दि. १५ सप्टेंबर, २०१९

# स्थानबद्धतेतून सराइतांवर पोलिसांचा अंकुश

## सहा वर्षांत ९७ सराइतांवर कारवाई; चालू वर्षात १३ जण स्थानबद्ध

पुणे : अशोक मोराळे

शहरात सतत गुन्हेगारी कारवाया करून कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत प्रश्न निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगारांवर 'महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ डेंजरस अॅक्टिव्हिटी अॅक्ट' म्हणजेच 'एमपीडीए' कायद्यानुसार कारवाई करण्याचा पोलिसांनी सपाटा लावला आहे. त्यामुळे राज्य संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोका) आणि एमपीडीएच्या या धडक कारवाईचा गुन्हेगारांनी चांगलाच धसका घेतला असून, चालू वर्षाच्या गत नऊ महिन्यांत पोलिसांनी १३ सराईत गुन्हेगारांना स्थानबद्ध करून त्यांची रवानगी थेट येरवडा कारागृहात केली.

शहरात एकमेकांच्या वर्चस्ववादाच्या लढाईतून दहशत निर्माण करत वाहनांची तोडफोड करणे, नागरिकांना मारहाण करणे, खून, खुनाचा प्रयत्न, व्यावसायिकांना खंडणी मागणे, घातक हत्यारे बाळगणे, हत्याराच्या धाकाने जबरी चोऱ्या करणे, दंगा निर्माण करणे अशा सराइतांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हे शाखेचे अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे यांनी पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना सतत गुन्हे करणाऱ्या सराइतांची मास्टर कुंडली तयार करण्यास सांगितले होते.

नुकतीच पोलिसांनी दोघा सराइतांवर एमपीडीए कायद्यानुसार कारवाई केली. अल्ताफ ऊर्फ बचक्या इक्बाल पठाण (२८, रा. अप्पा टिंगरे चाळ, विठ्ठलमंदिराच्या मागे, धानोरी), प्रवीण ऊर्फ भय्या प्रताप शिंदे (२२, रा. ८८६, कसबा पेठ) अशी सराइतांची नावे आहेत.

अल्ताफ पठाण हा विश्रांतवाडी पोलिस ठाण्याच्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर बंडगार्डन, कोंढवा व कोरेगाव पार्क पोलिस ठाण्याच्या परिसरात कोयता, चाकू, लाकडी काठी, लोखंडी बार, चाकू यांसारखी हत्यारे बाळगून घरफोडी, दुखापत, चोरी, दंगा अशा प्रकारचे

> शहरात सराईत गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिसांकडून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. वारंवार गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या गुन्हेगारांवर एमपीडीए अॅक्टअनुसार चालू वर्षात १३ जणांवर स्थानबद्धतेची कारवाई करून त्यांची रवानगी कारागृहात करण्यात आली. आगामी कालावधीतदेखील ही कारवाई सुरू राहील.
>
> **-बच्चन सिंह**, उपायुक्त, गुन्हे शाखा

२०१३ पासून ९ गुन्हे दाखल आहेत; तर प्रविण शिंदे हा फरासखाना पोलिस ठाण्याच्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावरदेखील शिवाजीनगर, फरासखाना, विश्रामबाग व समर्थ पोलिस ठाण्याच्या परिसरात घातक हत्यारे बाळगून खुनाचा प्रयत्न, दुखापत, खंडणी मागणे, दंगा, वाहने जाळणे, घरात प्रवेश करणे, धमकावणे असे २०१३ पासून तब्बल सात गुन्हे दाखल आहेत.

गुन्हेगारांची त्यांच्या परिसरात मोठी दहशत असते. त्यामुळे अनेकदा नागरिक त्यांच्या विरोधात तक्रार दाखल करण्यास पुढे येत नाहीत. त्यामुळे दिवसेंदिवस अशा सराइतांची गुन्हेगारी कृत्ये वाढतच जातात. यामुळे पोलिस आणि प्रशासनापुढे अनेकदा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. अशा सराइतांवर जरब निर्माण व्हावी, यासाठी पोलिसांकडून सतत प्रयत्न केले जातात. सुरुवातीला या सराइतांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते; मात्र तरीदेखील त्यांच्या गुन्हेगारी कृत्यावर कोणताही परिणाम दिसून आला नाही, तर त्यांच्यावर एमपीडीए कायद्यानुसार कारवाई करून कारागृहात स्थानबद्ध केले जाते.

### पाहा, काय म्हणते आकडेवारी?

एमपीडीए कायद्यानुसार कारवाई

- २०१६ : २५
- २०१७ : ३०
- २०१८ : ११
- २०१९ : १३ (चालू वर्ष)

# मसाजच्या नावाखाली चालणाऱ्या वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश

## पाच विदेशी महिलांची सुटका

**पुणेः प्रतिनिधी**

गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागने अशोका मॉल येथील पहिल्या मजल्यावरील शॉपमध्ये मसाज सेंटरच्या नावाखाली चालणाऱ्या वेश्या व्यावसायाचा पर्दाफाश केला आहे. या वेळी टुरिस्ट व्हिजावर असलेल्या पाच विदेशी महिलांची वेश्या व्यावसायातून सुटका केली असून, त्यांची रवानगी सुधारगृहात करण्यात आली आहे.



यात्रकरणी स्पा मालक गोपाल रमेश मिश्रा (वय. ३२, रा.रामनगर येरवडा) याला अटक करण्यात आली असून, त्याच्या विरुद्ध कोरेगाव पार्क पोलिस ठाण्यात पिटा कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकातील अधिकारी उपनिरीक्षक खडके यांना बातमीदारामार्फत या ठिकाणी मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्या व्यावसाय सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून छापा टाकला असता हा प्रकार समोर आला. याप्रकरणी मसाज सेंटच्या मालकाला अटक करण्यात आली आहे. पुढील कारवाईसाठी गुन्हा दाखल करून त्याला कोरेगाव पार्क पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

पथकाच्या निरीक्षक शिल्पा चव्हाण यांन सहकारनगरमधील अपार्टमेंटमध्ये वेश्या व्यावसाय सुरु असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार छापा टाकू महिलेला अटक केली. तिच्याकडे अधिक तपास केल असता ती पीडित तरुणीला पैशाचे आमिष दाखवून वेश्य व्यावसाय करून घेत असल्याचे समोर आले. त्यानुस तिच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.

### महिलेला अटक

वेश्या व्यवसायासाठी प्रवृत्त केल्याप्रकरणी एका महिलेविरुद्ध सहकार नगर पोलिस ठाण्यात पिटा कायद्यानसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, रुक्मिणी एकनाथ मिटकर (वय.३५,रा.धनकवडी) असे गुन्हा दाखल झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी, हवालदार विजय देशमुख यांनी फिर्याद दिली आहे. या वेळी २७ वर्षीय तरुणीची वेश्या व्यावसायातून सुटका करून तिची रवानगी रेस्क्यू फाउंडेशनमध्ये करण्यात आली आहे.

पुढारी – दि. २३ सप्टेंबर, २०१९

# बनावट वस्तू बनवणाऱ्या कंपनीचा पर्दाफाश

## सोळा लाखांचा ऐवज जप्त; नामांकित कंपनीचे हँडवॉश, रूमफ्रेशनर, टॉयलेट क्लीनर जप्त; एक अटक, मालकासह इतर फरार

**पुणे : प्रतिनिधी**

हँडवॉश, रूमफ्रेशनर, टॉयलेट क्लीनरसह घरगुती लागणाऱ्या वस्तू बनावट तयार करून त्यावर भारतातील नामांकित कंपनीच्या लेबलचा वापर करून विक्री करणाऱ्या एका कंपनीचा गुन्हे शाखेने पर्दाफाश केला. येथून तब्बल १६ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. या वस्तू पुण्यासह इतर शहरांमधील दुकानदारांना देऊन विक्री करण्यात येत असल्याचेही समोर आले.

हितेश राघवजी रावरिया (वय ३०, रा. नऱ्हे) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. तर, व्यावसायिक रामजी महादेव पटेल (वय ४२, रा. बिबवेवाडी) व त्याच्या साथीदारांचा शोध घेण्यात आला. या प्रकरणी कोंढवा पोलिस ठाण्यात फसवणुकीसह कॉपीराइट ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

शहरातील बेकायदेशीर चालणाऱ्या गोष्टींवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. गुन्हे शाखेकडून



**पोलिसांनी जप्त केलेल्या बनावट वस्तू.**

कारवाई सुरू आहे. युनिट तीनमधील संतोष क्षीरसागर व अतुल साठे यांना माहिती मिळाली की, कात्रज-कोंढवा रस्त्यावरील गोकूळनगर भागात एका पत्र्याच्या शेडमध्ये डायव्हर्सी, लायझॉल, विम, विको टर्मरिक, हार्पिक अशा भारतातील नामांकित कंपन्यांचे उत्पादन असणाऱ्या वस्तू हुबेहूब तयार करतात. तसेच, त्यावर नामांकित कंपन्याचे लेबल लावून विक्री केली जात असल्याचे समजले. त्यानुसार या माहितीची खातरजमा करण्यात आली. त्यानंतर अप्पर पोलिस आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली राजेंद्र मोकाशी, उपनिरीक्षक संजय गायकवाड, किरण अडागळे, कर्मचारी संदीप तळेकर, सुजित पवार, प्रवीण तापकीर, शकील शेख, मच्छिंद्र वाळके व त्यांच्या पथकाने या ठिकाणी छापा घातला. या वेळी हितेश याला ताब्यात घेण्यात आले. तसेच, माहिती घेण्यात आली. त्या वेळी आरोपी हे बनावट माल तयार करीत असल्याचे लक्षात आले.

यामुळे संबंधित कंपन्याच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांना बोलावण्यात आले. या वेळी मुंबईतून काही अधिकारी आले. त्यांनी या वस्तूंची तपासणी केली. त्या वेळी या वस्तू निकृष्ट दर्जाच्या तयार करण्यात येत असल्याचे त्या अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यानुसार गुन्हा दाखल करून हितेश याला अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता ३० सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

### दोन वर्षांपासून कारखाना सुरू

आरोपी हे मुळचे गुजरात राज्यातील मेघपर बच्छाव तालुक्यातील आहेत. वर्दळीच्या परिसरातच आरोपींनी गेल्या दोन वर्षांपासून हा उद्योग सुरू केला होता. भाड्याने ही जागा घेण्यात आली होती. याठिकाणीच माल तयार करून त्यावर लेबल लावण्याचे काम करण्यात येत होते. फोलेक्स नावाने कंपनी सुरू होती. वस्तूंवरील लोगोमध्ये वर्तुळाकारात इंग्रजीत आर असे लिहिले जात होते. त्यांनी हा माल पुण्यासह इतर शहरांमधील दुकानदारांना विक्री केल्याची माहिती आहे. दोन वर्षात नेमका किती माल विक्री झाला तसेच तो कुठे-कुठे विक्री केला गेला, याची माहिती घेतली जात आहे.

पुढारी – दि. ३० सप्टेंबर, २०१९

# वाघाच्या कातड्याची तस्करी

## पाच लाखांच्या कातडीसह एक दुचाकी जप्त

**पुणे : प्रतिनिधी**

वाघाच्या कातड्याची तस्करी करणाऱ्या औरंगाबादच्या दोघांना गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने पुण्यात जेरबंद केले आहे. रामेश्वर हरिश्चंद्र देशमुख (वय ३५), विजय गणपत जगताप (वय ३८, रा. दोघेही औरंगाबाद ) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी दोघांच्या विरुद्ध समर्थ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



औरंगाबादच्या दोघांना पुण्यात अटक.

या वेळी आरोपींच्या ताब्यातून पाच लाखांची वाघाची कातडी व चाळीस हजारांची दुचाकी असा तब्बल पाच लाख ४० हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

गुन्हे शाखेकडील पोलिस कर्मचारी सचिन जाधव यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, शहरात समर्थ पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन व्यक्ती वाघाचे कातडे घेऊन येणार आहेत. त्यानुसार पथकाने सापळा रचून संशयित दोघांना ताब्यात घेतले.

दरम्यान मागील काही दिवसांपूर्वी दत्तवाडी पोलिसांनी लाखोंचे हस्तीदंत कात्रज परिसरातून जप्त केले होते. त्यामध्ये दोघांना अटक करण्यात आली होती. हे दोघेही हस्तीदंताची विक्री करण्यासाठी शहरात आले होते. त्यामुळे शहरात प्राण्यांच्या अवयवांची तस्करी तर होत नाही ना, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# Crime Branch busts interstate gang

**ST CORRESPONDENT**
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** The sleuths from Crime Branch Unit 4 of Pune city police busted an interstate gang which was involved in stealing luxury items from malls.

DCP (Crime) Bachchan Singh said, "Preliminary investigation shows their involvement in cases across Delhi, Mumbai, Pune and other cities. They fly by air, stay in hotels and target malls. They used to be well dressed so that the salespersons do not suspect them."

According to the police, the gang was busted while investigating theft of four Rado watches worth Rs 5.04 lakh from a showroom in Pavilion Mall on Senapati Bapat Road. The shop owner came to know about the theft during stock checking on August 23. From the CCTV footage, they zeroed in on two persons who had visited the shop between 3.30 pm and 3.45 pm on August 8. An FIR was registered in this regard with Chatuhshrungi police station.

Police Inspector Anjum Bagwan, in-charge of Unit 4, said, "During the investigation, we learnt that the accused had reached the mall by cab. Further probe led us to a lodge in Mangalwar Peth, where they had stayed. They had come to Pune the same day from Delhi via a flight."

**According to police, the gang was busted while investigating theft of four Rado watches worth Rs 5.04 lakh from a showroom in the Pavilion Mall on Senapati Bapat Road.**

Acting on a tip-off received by policeman Sachin Dhawle, a team led by PSI Nileshkumar Mahadik was sent to Delhi. The cops camped there for five days searching for the accused persons. The arrested persons have been identified as Ashish Kushal Bisht (30), Akash Balkisan Dhaka (26) and Ravinder Singh Amarjit Singh (32), all residents of New Delhi.

Inspector Bagwan added, "There are about 12 persons in their gang who targeted luxury items like clothes, watches etc, for personal use as well as sold them."

The investigation team included policemen Ashok Shelar, Shankar Patil, Nilesh Shivtare, Raju Mache, Ganesh Kale, Shankar Sampate, Bhalchandra Borkar and Suhas Kadam.

TIMES OF INDIA - 20 September, 2019

# Cops seize 452 choppers over two days, arrest six

Asseem Shaikh
@timesgroup.com

**Pune:** The Pune crime branch has arrested six men and seized 452 choppers, locally known as sattur, in searches conducted at five shops located across Mangalwar Peth, Ganesh Peth, Swargate and Kondhwa over Wednesday and Thursday.

The police pointed out that a large number of criminals use choppers and sickles, or koyta, to commit crimes and vandalize vehicles in Pune district. Ahead of the state assembly elections, the police launched a drive to trace the source of such weapons as they are easily available in the local market.

Overall, four FIRs were under relevant sections of the Arms Act and Maharashtra Police Act, including two with Faraskhana and one each with Khadak and Kondhwa police stations.

In the first action, a police team questioned Jaisingh Pawar (34) of Mangalwar Peth. The leads provided by Pawar led to the recovery of 11 choppers. Later, 131 choppers were seized from a shop owned by Mahavir Gupta and 229 weapons from shops owned by Dnyaneshwar Naik and his brother Ashish Naik. The seized weapons are collectively worth Rs83,930.

The crime branch also conducted searches at two shops at Meethanagar in Kondhwa and seized 81 sickles, choppers and knives. The owners Zamir Shikalgar (44) and Zahid Sikilkar (60) were arrested.

Deputy commissioner of police (crime) Bachchan Singh told TOI, "We have issued instructions to all crime branch units to take action against shop owners and others selling such weapons."

Singh stated, "In their defence, the shop owners have the told police that they sell the choppers to farmers, not criminals. Investigations have revealed that they do not maintain a record of the sale. The criminals use the weapons because of easy availability, for instance a sickle or chopper costs about Rs200."

Pic: Asseem Shaikh

## STEP IN THE RIGHT DIRECTION

- The Pune crime branch has launched a drive to check sale of choppers/sattur to deter criminals from using the deadly weapon
- The police have seized 452 choppers/sattur, arrested six suspects and lodged four FIRs, including two at Faraskhana and one each at Khadak and Kondhwa police stations, over the past two days
- The suspects have been charged for possessing weapons under Sections 4 (25) of the Arms Act and 37 (1) read with 135 of the Maharashtra Police Act



### SIZE MATTERS

- The length of the weapons seized by the police is between 9 and 12 inches. The Arms Act specifically mentions that the length of the chopper's blade be restricted to below 6 inches. The weapons seized are of superior quality, the police said

### RISING NUMBERS

- 829 criminals/others have used choppers/sickles in 545 cases registered with the police since 2017
- Criminals/others involved in using choppers have been arrested for committing offences under Sections 307 (attempted murder) and 326 (voluntary causing grievous hurt) of the Indian Penal Code as well as relevant sections of the Maharashtra Police Act

# अभिप्राय...

प्रति,

मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर
यांना सविनय सादर,

प्रतिवेदक :- आर.के.गोसावी, पोलीस हवालदार ५३८८, सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे

विषय :- दर्पन पुस्तकासंदर्भात अभिप्रायबाबत.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती नागरिकांना समजावी या उद्देशाने पोलीस ठाणे येथे दैनंदिनी कामकाज करीत असताना झालेल्या चांगल्या कामगिरीबाबतची प्रेसनोट जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचे कार्यालयात सादर करणेबाबत दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस ठाणे येथे आठवडाभरामध्ये झालेल्या चांगल्या कामगिरीची प्रेसनोट सादर करण्यात येत असुन सदरची प्रेस नोट वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर सदरचे पेपर कात्रनाची कटिंग करुन त्या पासुन दर्पन हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. सदरचे पुस्तक हे ठाणे अमंलदार कक्षामध्ये ठेवण्यात येत असुन पोलीस ठाणे येथे येणारे नागरिकांना सदरचे पुस्तक वाचण्यासाठी देण्यात येत असते.

दर्पन या पुस्तकामुळे पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती एकत्रीतपणे वाचण्यासाठी उपलब्ध झालेली असुन दर्पन पुस्तक वाचल्यानंतर नागरिक हे पोलीसांचे चांगल्या कामाचे कौतुक करत आहे. नागरिकांच्या मनामध्ये पोलीसांविषयी चांगल्या प्रकारची भावना निर्माण होत आहे. तसेच पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांचेही मनोबल वाढलेले असुन ते ही चांगली कामगिरी करुन आपले नाव व फोटो वर्तमान पत्रामध्ये येवुन त्याचे कात्रण दर्पण पुस्तकामध्ये समाविष्ट होणेसाठी चांगली कामगिरी करण्याचे प्रयत्न करीत आहेत.

मा. सादर व्हावे,
दि. १८/०६/२०१९

( आर.के.गोसावी )
पोलीस हवालदार ५३८८
सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे शहर.

---

प्रति,

मा. पोलीस आयुक्त सो,
पुणे शहर
यांना सविनय सादर

रिपोर्ट : - के एस पलांडे पोलीस शिपाई ८५६४ चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर
यांजकडुन विनंती पुर्वक की,

विषय : - दर्पण पुस्तिकेच्या अभिप्रायाबाबत...

महोदय,

/- उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मी चंदननगर पोलीस स्टेशन या ठिकाणी ०३ वर्षापासुन नियुक्तीस असुन सायबर विभागामध्ये काम करत आहे. मा.पोलीस आयुक्त सो यांनी दर्पण पुस्तीकेच्या माध्यमातुन पोलीसांनी केलेली कामे, गुन्हयाचा लावलेला शोध, जेष्ठ नागरिकांना केलेली मदत व गुन्हास प्रतिबंध होणेसाठी केलेल्या उपाययोजना तसेच सामान्य नागरीकांना येणाऱ्या अडचणी कशा सोडवाव्या या सदंर्भात केलेले मार्गदर्शन केले आहे. तसेच पोलीसांनी केलेल्या कामचे प्रशिस्ती प्रत्रक दपर्ण या पुस्तीकेच्या माध्यमातुन समाजासमोर मांडले आहे. त्यामुळे पोलीस व सामान्या नागरीकामध्ये चांगले सबंध तयार होत आहेत. त्यामुळे दर्पण ही पुस्तीकेचे पोलीस स्टेशनला येणारे नागरीक खुप कौतुक करत आहेत.

दर्पण पुस्तीका पोलीसांनी केलेल्या कामाचा सन्मानाबाबात मा.पोलीस आयुक्त सो. यांचे खुप खुप अभिंनंदन. माननियांना सादर

तरी सदर माहिती अवलोकन व आदेशार्थ सविनय सादर.

मा.सादर व्हावे
दि. १६/०५/२०१९

पोलीस शिपाई ८५६४
चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर



सिंहगड रस्ता पोलिसांची कामगिरी : सोशल मीडिया व सीसीटीव्हीच्या आधारे घेतला शोध

चुकलेला मुलगा विसावला आईच्या कुशीत

At junctions of Smart City, an 'intelligent' syste

to help manage Pune's many traffic problems

आयुक्तांकडून कॉन्स्टेबलला मिळाले 'सरप्राईज गिफ्ट'

avy police cover, traffic curbs

epares to bid farewell to Ganpa

गुन्हे शाखेने ८० लाखांचे हस्तिदंत पकडले

नदीत पडलेल्या मुलाचे पोलिसांनी वाचविले प्राण

येरवडा पोलिसांची कामगिरी

तब्बल २२ वर्षे फरार असलेल्यास केले जे

स्थानबद्धतेतून सराइतांवर पोलिसांच

सहा वर्षांत ९७ सराइतांवर कारवाई; चालू वर्षात १३ जण स्थानब

th checks

ss programmes during

व्हिडिओ कॉल सुरू ठेवून आत्महत्येचा प्रयत्न

वक्तृत्वाने व्यक्तिमत्त्व होते समृद्ध

तत्काळ मदतीला धावून पोलिसांनी वाचवले प्राण

चोरांची टोळी अटके

८२ मोबाइल जप्त

आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम : पोलिसांनी केला शिक्षकांचा सन्मान

नदीत उडी मारलेल्या तरुणाला वाचवले

द्धिवादाची जोपासना करा

ज्याच्या नावाखाली चालणा

या व्यवसायाचा पर्दाफाश

विदेशी महिलांची सुटका

यंदा पाचशे तक्रा

तंबाखूजन्य पदार्थ

णणाऱ्यांवर कारवाई

गदान प्रेरणादायक : बापट

दागिनेचोर जेरबंद

शिवाजीनगर कोर्टात २०० जणांची

ILLEGAL SAND TRANSPORTATION

Driver arrested for stealing trucks attached by revenue dept officials

डॉक्टरच्या वेशातील वाहनचोरास अटक

बनावट वस्तू बनवणाऱ्या कंपनीचा पर्दाफाश

गुन्हेगार जेरबं

ठ गुन्हे उघडकीस; येरवडा पोलिसांची का

वाघाच्या कातड्याची तस्करी

बंदोबस्तासाठी असलेल्या २०० पोलिसांच्या भोजनाची व्यवस्था

e Branch busts inters

बेकायदा पिस्तूल बाळगणारा अटकेत

atches' in Pune

परराज्यातील टोळी गजाआ

seize 452 choppers

wo days, arrest six

महागडी घड्याळे लांबविणारी दिल्लीतील चोरट्यांची टोळी

पिस्तुलाची हौस पडली महागात!

दोघांना अटक; भारती विद्यापीठ पोलिसांची कारवाई

दोन दिवसांत ३७५ कोयते जप्त

तीन वर्षांतील साडेपाचशे गुन्ह्यांत झाला वापर : चौघांना अटक